महाराष्ट्र शासन

जा.क्र.: मनासो 2023/प्र.क्र ११८/कौशल्य-2
कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: २६/०७/२०२३

आशिष कुमार सिंग, भा. प्र. से.
अपर मुख्य सचिव

**विषय : "महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज" उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी बाबत.**

राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण" जाहीर करण्यात आले. सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. या धोरणाच्या माध्यमातून राज्यामध्ये स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्याकरिता, इनक्युबेटर्सची स्थापना व विस्तार, गुणवत्ता परीक्षण व बौद्धिक संपदा हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रँड चॅलेंज, स्टार्टअप वीक यांसारख्या अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत महाराष्ट्र **स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचे** आयोजन करण्यात येत आहे. राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवउद्योजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी योग्य ते पाठबळ पुरवणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचे ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत,

- महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी नवउद्योजक व त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचा शोध घेवून त्यांना आवश्यक व्यासपीठ उपलब्ध करुन देणे
- सदर नवउद्योजकांना प्रोत्साहन, तज्ज्ञ मार्गदर्शन, निधी व आवश्यक पाठबळ पुरवणे
- परिणामी राज्यातील नाविन्यपूर्ण परिसंस्था बळकट करणे

२७/७
उ.स.(कोरी)

या उपक्रमांचे अनावरण दि. १५ जुलै २०२३ रोजी मा. मंत्री कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले. राज्यातील शासकीय व खासगी विद्यापीठांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शैक्षणिक संस्था तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना सहभाग घेता येईल. सदर उपक्रमाचे मार्गदर्शक तत्वे सोबत जोडण्यात आले आहेत.

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आपणास खालील बाबींसाठी नियोजन करण्याची विनंती आहे,

१. आपल्या अधिपत्याखाली येणाऱ्या सर्व विद्यापीठांनी या उपक्रमात नोंदणी करून सहभाग नोंदवावा यासाठी योग्य ते निर्देश देण्यात यावेत.
२. नोंदणीनंतर सर्व विद्यापीठांतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागासाठी प्रवृत करणे.
३. या उपक्रमाचे आयोजन व यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या सूचना देणे.

वेळापत्रक (प्रस्तावित)

| | |
|---|---|
| **पहिला टप्पा : संस्थांची नोंदणी व संस्थास्तरावर संकल्पनांची निवड** | |
| शैक्षणिक संस्थांची नोंदणी | १५ जुलै - १५ ऑगस्ट २०२३ |
| विद्यार्थ्यांकडून अर्जासाठी मागणी | १ ऑगस्ट - ३१ ऑगस्ट |
| संस्था स्तरावर सादरीकरण सत्र | १० सप्टेंबर - २० सप्टेंबर |
| संस्थानिहाय सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २३ सप्टेंबर |
| **दुसरा टप्पा** | |
| जिल्हास्तरीय १०० सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २५ सप्टेंबर |
| प्रशिक्षण सत्र | २७ सप्टेंबर - ५ ऑक्टोबर |
| जिल्हास्तरावर सादरीकरण सत्राचे आयोजन | ६ ऑक्टोबर - १५ ऑक्टोबर |
| प्रत्येक जिल्ह्यातून १० विजेत्यांची घोषणा | १८ ऑक्टोबर |
| **तिसरा टप्पा** | |
| इन्क्युबेशन सहाय्यासाठी मॅपिंग करून इन्क्युबेशन प्रोग्रामला सुरुवात | १२ महिन्यांसाठी इन्क्युबेशन सहाय्य |
| इन्क्युबेशन प्रोग्राम | |
| राज्यस्तरावर सादरीकरण सत्र आणि विजेत्यांची घोषणा | |

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज बाबत नोंदणी प्रक्रिया व अधिक माहिती महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या अधिकृत संकेतस्थळ www.msins.in व https://schemes.msins.in वर उपलब्ध आहे. आपल्या अधिपत्याखालील सर्व विद्यापीठांना या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवण्याबाबत अवगत करावे. मला विश्वास आहे की, आपल्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज हा उपक्रम यशस्वीरित्या कार्यान्वयित करण्यात येईल व राज्याच्या स्टार्टअप व नाविन्यता परिसंस्थेस अजून बळकटी मिळेल.

आपले स्नेहांकीत,

**आशिष कुमार सिंग, भा. प्र. से.**
**(अपर मुख्य सचिव)**

प्रति,
श्री. विकास चंद्र रस्तोगी,
प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
महाराष्ट्र राज्य